# बृहन्मुंबई महानगरपालिका

**वरिष्ठ निरिक्षक, ई विभाग यांचे कार्यालय, नविन प्रशासकिय इमारत, चौथा मजला,**

**न्यु हिंद मिल, म्हाडा कॉलनी, रामभाऊ भोगले मार्ग, घोडपदेव, कॉटन ग्रीन रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ४०० ०३३.**

---

## जाहीर सूचना

**विषय:** 'ई' विभागामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता स्थानिक बेरोजगार सेवा सहकारी संस्थेमार्फत कंत्राटी कामगार पुरवठा करण्याबाबतची जाहीर सूचना .

'ई' विभागामध्ये सन २०२६ -२०२७ या आर्थिक वर्षातील दि. ११.०५.२०२६ ते १२.११.२०२६ या १६० दिवसांच्या (रविवारची सूट्टी वगळून) कालावधी करिता, अतिक्रमण निर्मुलन वाहनावर काम करण्याकरिता स्थानिक बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडून कंत्राटी कामगार पुरवण्याबाबत, पात्रता यादी तयार करून, सोडत पध्दतीने निवड करून काम करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. या निवड झालेल्या संस्थेकडून प्रतिदिन ०८ तासाकरिता एकूण १० कामगारांची आवश्यकता आहे.

अर्जाचा नमूना वरिष्ठ निरिक्षक, अतिक्रमण निर्मुलन (अनुज्ञापन खाते )'ई'विभाग खोली क्र. २१, चौथा मजला, न्यु हिंद मिल, म्हाडा कॉलनी, रामभाऊ भोगले मार्ग, घोडपदेव, मुंबई - ४०००३३. यांच्याकडे रू ३९९३ /- अधिक १८% जीएसटी असे रोख स्वरूपात (ना-परतावा ) दि. ०९.०५.२०२६ते १३.०५.२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यत मिळू शकेल. निकषानुसार पात्र सूचीमधून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या एका संस्थेला कामाच्या अटी व शर्तीनुसार कामाचे वाटप 'ई' विभागाचे मा.सहाय्यक आयुक्त करतील. सोडत पध्दतीची निकाल प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार, मा.सहाय्यक आयुक्त 'ई' विभाग यांना राहतील.

अर्ज करण्याची **अंतिम तारीख दि. १३.०५.२०२६ दुपारी ०१ वाजेपर्यंत** (सिलबंद लिफाफ्यात) असेल. त्यानंतर दाखल केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

उपरोक्त निकषामध्ये न बसणा-या संस्थाना कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी .

सही/- दि.०६.०५.२०२६

**सहाय्यक आयुक्त 'ई' विभाग**